९.

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

## गुरुवार दिनांक ०३/०४/२००२ रोजी झालेल्या ७६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७६ वी बैठक बुधवार दि.०३/०४/२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता, गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.एस्.एस्.झेंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ६. | मा.श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ७. | मा.श्री.रमेश परब | सदस्य |
| ८. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ९. | मा.श्री.मोहन देसाई | सदस्य |
| १०. | मा.श्री.बाप्पा सावंत | सदस्य |
| ११. | मा. श्री. अबुबकर मूसा बाटलीवाला | सदस्य |
| १२. | प्रमुख अभियंता, म.न.पा. हयांचे प्रतिनिधी | निमंत्रक |
| १३. | उपकर संचालक व निर्धारक,म.न.पा.हयांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरवातीस मा.सदस्य श्री रमेश परब हयांनी सभागृहास असे सांगितले की, मा.सदस्य श्री.विश्वास मोकाशी हे आजारी असल्याने ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत. तसेच मा. सदस्य श्री कमरुद्दीन मर्चंट हे पक्षांतर्गत कामासाठी दिल्लीला गेले असल्याने हया बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. मा. सदस्य श्री संजय शिर्के हे धार्मिक कार्यानिमित्त गावी गेले असल्याने तेही हया बैठकीस उपस्थित राहू शकलेले नाहीत.

तदनंतर मा. सदस्य श्री रमेश परब हयांनी मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांची इंदिरा काँग्रेस पक्षातर्फे स्विकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याने, सभापती, सर्व सन्मा. सदस्य व उपस्थित अधिकारी/कर्मचारी वर्गातर्फे त्यांचे अभिनंदन केले. तसेच मा. सभापती व मा. सदस्य श्री मोहन देसाई, श्री बाप्पा सावंत, श्री बाटलीवाला व श्री उस्मान गणी कुरेशी हयांनी मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांना उपस्थित सर्व सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गातर्फे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

तदनंतर मा.सदस्य श्री रमेश परब हयांनी, मा. सभापती/दु.व पु. हयांना कन्या रत्नाचा लाभ झाल्याने , उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारीवर्गातर्फे त्यांचे अभिनंदन केले.

तदनंतर मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व व अधिकारी/कर्मचारीवर्गाचे स्वागत करुन सचिवाना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या.

**बाब क्रमांक : ७६/१**

विषय- गुरुवार दि.७.३.२००१ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ७.३.२००१ रोजी संपन्न झालेल्या ७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ६१ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीत घुसखोर व्यक्तींना पुनर्रचित गाळे विक्री करण्याचा जो प्रस्ताव सादर केला होता, त्याबाबत लेखा परिक्षकांनी जे आक्षेप घेतले होते त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याचे ठरले होते व नंतर हा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करण्याचे ठरले होते. हयाबाबत सद्यःस्थिती काय आहे?

हयाबाबत सहमुख्य अधिकारी हयांनी असा खुलासा केला की, मंडळाच्या मागच्या बैठकीचे कार्यवृत्तांत आजच्या बैठकीत स्थायी केल्यानंतर आपण हा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करणार आहोत.

हयाबाबत मा. सभापती हयांनी अशा सूचना दिल्या की, हे प्रकरण लवकर निकालात काढण्यासाठी प्राधिकरणाच्या येत्या बैठकीत सादर करावे.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

..................................

**दक्षिण परिमंडळ**

**बाब क्रमांक : ७६/२**

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.६३ ते १३७ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (दक्षिण) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावांमधील पृ.क्र. ८९ वर सादर केलेल्या इ.क्र.५, आर्देशीर दादी स्ट्रीट, क्रॉस लेन हया इमारतीच्या दुरुस्तीच्या दुस-या टप्प्यातील अंदाजपत्रकामध्ये निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ५८६८०/- नजरचुकीने नमूद केली आहे. सदर रक्कम प्रत्यक्षात रु.५८६५८०/- अशी आहे. तसेच पृ.क्र.१३५ वर सादर करण्यात आलेले इ.क्र. ३४२-३४४, बेलासीस रोड सद्यः हया कार्यसूचीतून मागे घेण्यात येत आहे. त्यामुळे दक्षिण परिमंडळातील ए विभागातील २, बी विभागातील ४, सी१-२ विभागातील ३, सी३-४ विभागातील २, डी-१ विभागातील १० व डी-२ विभागातील ७ असे एकूण २८ इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याची विनंती उपमुख्य अभियंता (द.) हयानी केली.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण २८ इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७६/५७५

दक्षिण परिमंडळातील एकूण २८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---

**उत्तर परिमंडळ**

**बाब क्रमांक : ७६.३ (अ)**

विषय- **वाढीव खर्चास मंजूरी मिळण्याबाबतचे प्रस्ताव.**

१) इ.क्र.२०८ सी, गुडहोप चेंबर्स, डॉ.बी.ए.रोड,
२) इ.क्र.३८६ ए, ३८६ बी, हाजी कासम चाळ, डॉ.बी.ए.रोड,
३) इ.क्र.२०९ लतीफ बिल्डिंग, डॉ.बी.ए.रोड,
४) इ.क्र.४०६ सी, मणी भवन, तेलंग रोड, माटुंगा,
५) इ.क्र.२९०-२९० डी, केसरी चाळ, तुळशी पाईप रोड,दादर

सदर प्रस्ताव पृ.क्र.१३९ ते १५७ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया पाचही इमारतींच्या दुरुस्ती कामामध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च हा मंजूर प्रशासकीय रक्कमेपेक्षा अधिक झाला असून रु. १०००/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढीव झालेल्या खर्चास मंजूरी देणे आवश्यक असून त्यानुसार हे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती हया ५ इमारतींच्या दुरुस्ती कामांमध्ये प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५७६**

उत्तर परिमंडळातील खालील पाच इमारतींच्या दुरुस्ती कामामध्ये प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

| अ.क्र. | इमारतीचा तपशील | | प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक मंजूर केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | इ.क्र.२०८ सी, गुडहोप चेंबर्स, डॉ.बी.ए.रोड, | : | रु. २८,१३७/- |
| २. | इ.क्र.३८६ ए, ३८६ बी, हाजी कासम चाळ, डॉ.बी.ए.रोड, | : | रु. ६८,८३३/- |
| ३. | इ.क्र.२०९ लतीफ बिल्डिंग, डॉ.बी.ए.रोड, | : | रु. ३,५४,३५८/- |
| ४. | इ.क्र.४०६ सी, मणी भवन, तेलंग रोड, माटुंगा, | : | रु. ७०,८६४/- |
| ५. | इ.क्र.२९०-२९० डी, केसरी चाळ, तुळशी पाईप रोड,दादर | : | रु. १,०७,०६०/- |

**बाब क्रमांक: ७६/३ (ब)**

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.१५९ ते २६५ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील ४, फग/द विभागातील ८ व फग/ऊ विभागातील २५ अशी एकूण ३७ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय सन्मा. सदस्यांच्या विनंतीनुसार व मा. सभापती/दुवपु मंडळ यांच्या संमतीने आयत्यावेळच्या विषयामध्ये एकूण ६ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केली आहेत. हयापैकी इ.क्र.३०५-३०७, (सी. व डी. विंग), इ.क्र.३०७ बी, (बी.विंग) व इ.क्र.३०९-३२५, (अे.विंग), साने गुरुजी मार्ग, हया पूर्वी एकच इमारत गृहीत धरुन दि. २५.८.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान केली होती. परंतु हया इमारतीस तीन स्वतंत्र उपकर क्रमांक असल्याने तसेच भाडेकरुंनी केलेल्या विनंतीनूसार आता तीन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मंजूरीसाठी फेरसादर केली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील वरील एकूण ४३ इमारतींच्या दुरुस्तीच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५७७**

उत्तर परिमंडळातील एकूण ४३ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** नुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

---

**बाब क्रमांक :७६/४**

विषय- इ.क्र.१४९-१५२, आणि १४९ ए ते एच, आंबेवाडी, जगन्नाथ शंकर शेठ रोड, मुंबई-४०० ००४ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित आंबेवाडी सह.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी मंजूरी मिळणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र. २६७ ते २८९ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या प्रकरण ८-अे मधील कलम १०३ (ब) नुसार हया इमारतीतील रहिवाशांनी त्यांची इमारत सुस्थितीत ठेवण्याकरिता हया इमारतीचे मालकी हक्क हस्तांतरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. भू-संपादन

कार्यवाही सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाची त्यास मंजूरी घेणे प्रचलित पध्दतीनुसार आवश्यक असून त्यासाठी हा प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावांतर्गत इमारतींची अवस्था अतिशय खराब असून तांतडीने दुरुस्तीची आवश्यकता आहे. परंतु प्रमाणित मर्यादेमध्ये दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नसून प्रमाणित मर्यादेवरील जादा रक्कम भरण्याची रहिवाशांची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे आमदार निधी अंतर्गत दुरुस्तीसाठी निधी मंजूर करुन घेणे अनिवार्य आहे. अशा परिस्थितीत विषयांकित प्रस्तावास जर मंजूरी दिली तर त्यामुळे दुरुस्तीबाबत काही अडचणी उदभवणार नाही ना अशी विचारणा मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी केली.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनाच इमारतीचे मालकी हक्क हवे आहेत व त्यांनीच हा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे. भूसंपादन कार्यवाही सुरुवात करण्यासाठी शासनाची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने हा प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर केला आहे. हयामुळे हया इमारतींच्या दुरुस्तीबाबत अडचणी निर्माण होऊ नयेत असे वाटते.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५७८**

इ.क्र.१४९-१५२, आणि १४९ ए ते एच, **आंबेवाडी**, जगन्नाथ शंकर शेठ रोड, मुंबई-४०० ००४ हया इमारती त्याखालील भूखंडासह नियोजित आंबेवाडी सहकारी गृ.नि.संस्थेकरिता म्हाड अधिनियम १९७६ च्या प्रकरण ८-ए मधील कलम १०३-ब नुसार भूसंपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

---

**पुनर्बांधणी विभाग :-**

**बाब क्रमांक: ७६.५ (अ)**

विषय- इ.क्र.२२-बी, दत्त निवास, परेल गाव, फ/द विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.२९१ ते ३०१ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया योजनेच्या नकाशांना म.न.पा.ने दि. १४.३.२००२ रोजी मंजूरी दिली असून हया योजनेत १३ निवासी गाळे मंडळाला अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया योजनेचा भूसंपादनाच्या खर्चासह अंदाजित खर्च रु. १.०३ कोटी असून त्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यासाठी हा प्रस्ताव मंडळापुढे सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५७९**

इ.क्र.२२-बी, दत्त निवास, परेल गाव, फ/द विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्रचना योजनेच्या रु. १.०३ कोटी भूसंपादनासहित रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

---

**बाब क्रमांक : ७६.५ (ब)**

विषय- इ.क्र.९सी, ११बी, सी, डी, महालक्ष्मी टेम्पल कंपाऊंड, डी.विभाग, मुंबई हया पुनर्रचित इमारतीच्या नामांकन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र. ३०३ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी हया पुनर्रचित इमारतीस **श्री लक्ष्मीकृपा** हे नाव देण्याची विनंती केली असून त्यानुसार हा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीस **श्री लक्ष्मीकृपा** हे नाव देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५८०**

इ.क्र.९सी, ११बी, सी, डी, महालक्ष्मी टेम्पल कंपाऊंड, डी.विभाग,मुंबई हया पुनर्रचित इमारतीस **श्री लक्ष्मीकृपा** हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

---

**बाब क्रमांक : ७६/५ (क)**

विषय- ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. यांना बदली कामे देण्यासंदर्भात.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.३०५ ते ३११ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हयांनी राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत व जागतिक बॅंक कार्यालयातील ३ कामांच्या मोबदल्यात दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील ३ कामे देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच हया ठेकेदाराने मा. उच्च न्यायालयात त्या संदर्भात दावा दाखल केला असून त्याअन्वये रु.६६.७० लक्ष रक्कमेची नुकसान भरपाई देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. परंतु जर त्याला हया ३ कामांच्या बदली अन्य ३ कामे दिली तर त्याने हा दावा मागे घेण्याची तयारी दर्शविली आहे. ज्या ३ कामांच्या बदली कामे मागितली आहेत ती ३ कामे मुंबई मंडळातील होती. हया ३ कामांबाबत मुंबई मंडळाचे उपमुख्य अभियंता (स्थापत्य) हयांनी असे कळविले आहे की, हया तीन कामांच्या बदल्यात सदर ठेकेदाराना अन्य कामे देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

हयामुळे उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे मत प्रदर्शित केले की, ठेकेदारांनी ज्या ३ कामांच्या बदली अन्य कामे देण्याची विनंती केली आहे ती ३ कामे मुंबई मंडळातील असल्याने त्यांना दुरुस्ती व पुनर्रचना विभागात बदली कामे देणे योग्य वाटत नाही. त्यांना अन्य कामे मुंबई मंडळाने द्यावीत. हे प्रकरण मंडळाच्या मतांसह प्राधिकरणापुढे सादर करावयाचे असल्याने हयाबाबत मंडळाने मत देण्याची विनंती उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी केली.

हयाबाबत मा. सदस्य, श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळातर्फे हया ठेकेदाराला पूर्वी एक पुनर्रचनेचे काम दिले होते. हया कामाबाबत माहिती देण्याची विनंती त्यांनी का.अ./पु.वि.३ हयांना केली.

हयाबाबत का.अ./पु.वि.३ हयांनी असे प्रतिपादन केले की, हया ठेकेदाराना मंडळाने इ.क्र.७,९,११ व २४ ड फितवाला रोड, लोअर परेल हया इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम दिलेले आहे. हया ठेकेदाराने जे काम केले होते ते अपेक्षित गुणवत्ता व विनिर्देशानुसार करण्यात आलेले नसल्यामुळे त्यांना आपण व संबंधीत वास्तुशास्त्रज्ञांनी त्यांच्या कामाची गुणवत्ता सुधारण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याने जे सलोह कॉंक्रिटचे खांब (कॉलम) उभारले होते ते कॉलम सदर ठेकेदाराला तोडण्याबाबत कळविले होते. अशाप्रकारे हया ठेकेदाराच्या कामाची गुणवत्ता योग्य नव्हती. त्यामुळे हया कामात बराच कालापव्यय झालेला आहे.पूर्वीच्या वास्तुशास्त्रज्ञाने हे काम शेवटी सोडून दिले. आता नवीन वा.शा.ची नेमणूक केलेली आहे. तसेच आर.सी.सी. कन्सल्टंटची नेमणूक केलेली आहे. तदनंतर पुन्हा हया ठेकेदाराला सलोह कॉंक्रिटचे उभारलेले कॉलमस् तोडण्याच्या सूचना दिल्यानंतर हया ठेकेदाराने काही कॉलमस् तोडलेले आहेत. ठेकेदाराला वारंवार सूचना देऊनही ते त्या सूचनांचे पालन करण्याच्या मनःस्थितीत सुरुवातीला नव्हते. हयामुळे कामास बराच विलंब झालेला आहे.

हयाबाबत मा. सदस्य, श्री सचिन सावंत हयांनी असे मत प्रदर्शित केले की, वरील परिस्थितीत हया ठेकेदारास बदली काम दिल्यास तसा पायंडा पडून मोठी चूक होईल असे वाटते. एखाद्या कामाबाबत न्यायालयांत काम देणा-या संस्थेच्या विरुध्द दावा दाखल केलेला असताना न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करावे लागणार असल्याने, बदली काम दिल्यास न्यायालयीन दावा मागे घेतला जाईल असे सांगणे चुकीचे असून तसे झाल्यास तो एक प्रकारचा पायंडा पडेल. त्यामुळे हया ठेकेदारास बदली कामे देण्यास मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी सक्त विरोध दर्शवून त्यानुसार प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्यास सहमती दर्शविली.

हयाबाबत मा. सदस्य, श्री बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, आपण हया ठेकेदारास काम दिल्यानंतर तो आपल्याच विरुध्द न्यायालयात जातो व तद्नंतर न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता आपल्याकडून बदली कामे दिल्यास न्यायालयातील दावा मागे घेण्याबाबत कळवितो. हा ठेकेदार आपणास ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करीत आहे. एकतर आपण हया ठेकेदाराला कामे दिल्यानंतर तो ती करीत नाही व तदनंतर तो आपल्याविरुध्दच न्यायालयात दावा दाखल करतो. त्यामुळे मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे मत प्रदर्शित केले की, सदर ठेकेदारास " काळया यादीत " टाकून त्यांचे पंजीकरण रद्द करावे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, हा प्रस्ताव मंडळापुढे कसा सादर केला आहे. आपल्याकडे अशी पध्दत आहे का, की एखाद्या ठेकेदाराने बदली काम मागितल्यास तसा प्रस्ताव मंडळापुढे सादर करायचा. तसेच हया बाबत अधिका-यांचे मत काय आहे हयाचा उल्लेख प्रस्तावात न करता फक्त वस्तुस्थिती सादर करुन मंडळाचे मत विचारणे योग्य नाही. वस्तुतःअसे प्रस्ताव मंडळापुढे सादर करणेच योग्य नाही. कारण हयामुळे इतरही ठेकेदार अशाप्रकारे गैरफायदा घेऊन प्रस्ताव सादर करण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असा खुलासा केला की, हा प्रस्ताव प्राधिकरणाकडून आपल्यास प्राप्त झाला असून प्राधिकरणाने त्याबाबत मंडळाचे मत घेऊन सदर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार हा प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आलेला आहे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव प्राधिकरणाकडून आपल्याकडे आला असल्याबाबत सदर प्रस्तावात उल्लेख केलेला नाही. जर प्राधिकरण स्तरावर हया प्रकरणाबाबत विचारविनीमय चालू असेल तर प्राधिकरणानेच मुंबई मंडळातील पर्यायी कामे सदर ठेकेदारास द्यावीत. व जर प्राधिकरणाने मंडळाचे मत मागविले असेल तर त्याबाबत विधी सल्लागार/प्रा. व मुख्य अभियंता/प्रा. हयांची मते घेऊन आपणांस जर संयुक्तिक वाटले तर हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, सादर केलेल्या प्रस्तावानुसार आपण हया ठेकेदारास पर्यायी कामे ही मुंबई मंडळानेच द्यावीत असे प्रस्तावित केले आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाबाबत मुख्य अभियंता/प्रा. हयांचे मत घ्यावे. सुदैवाने सन्मा. सदस्यांना हया ठेकेदाराच्या कामाची माहिती अवगत आहे व त्यानुसार सन्मा. सदस्यांनी त्यांची मते प्रदर्शित केलेली आहेतच. त्यामुळे प्रशासनाचे व मंडळाचे हया प्रस्तावाबाबतचे स्पष्ट मत आहेच परंतु मुख्य अभियंता हे तांत्रिक व स्थापत्य विभागाचे प्रमुख असल्याने त्यांचे मत घेऊन हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत फेर सादर करावा.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव मंडळापुढे आजच्या बैठकीत सादर केला असल्याने व त्याबाबत मंडळाच्या सन्मा. सदस्यांनी त्यांची मते मांडली असल्याने हा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर न करता मुख्य अभियंता/प्रा. हयांचे मत घेऊन प्राधिकरणाकडे सादर करावा असे वाटते.

हयाबाबत मा. सभापती हयांनी अशा सूचना केल्या की, हया प्रस्तावाबाबत प्रशासन, सन्मा. सदस्य व मुख्य अभियंता/प्रा. हयांच्या मतांसह हा प्रस्ताव मंडळापुढे सादर न करता प्राधिकरणाकडे सादर करावा.

हयाबाबत मा. सदस्य, श्री मोहन देसाई हयांनी असे प्रतिपादन केले की, त्यांनी हयापूर्वीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत माहिती दिली होती. ही निकृष्ट कामे ज्यांनी केली आहेत त्यापैकी मे. आर.एस.गुप्ता आणि कं. हा ठेकेदार

आहे. त्यांच्या भागात बांधलेल्या "संघर्ष" इमारतीची अवस्था ५-६ वर्षात डबघाईला आलेली आहे. त्यामुळे अशी निकृष्ट कामे करणा-या ठेकेदारांना व वास्तुशास्त्राज्ञांना ब्लॅकलीस्ट करावे. हया परिस्थितीत हया ठेकेदारास पर्यायी कामे देण्याचा प्रस्ताव मंडळापुढे सादर करणे चुकीचे आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी, सन्मा. सदस्यांनी जी मते मांडली आहेत त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. तसेच मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, आपण हा जो प्रस्ताव सादर केला आहे त्यातही सन्मा. सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांपेक्षा वावगे असे काही नमूद केलेले नाही. मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी नमूद केल्यानुसार वेगळा पायंडा पाडण्याचाही आपला विचार नाही. प्राधिकरणाकडून हया प्रस्तावाबाबत आपल्या मंडळाचे मत मागविले असल्याने त्यानुसार हा प्रस्ताव मंडळापुढे सादर केलेला आहे. त्यामुळे आपण आपले हया प्रस्तावाबाबतचे मत प्राधिकरणाकडे सादर करण्यास काहीच हरकत नाही.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या मतांसह व मुख्य अभियंता/प्रा. हयांच्या मतासह प्राधिकरणाकडे सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५८१**

ठेकेदार मे. आर.एस.गुप्ता आणि कं. यांना बदली कामे देण्याबाबतचा प्रस्ताव, सन्मा. सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांसह मुख्य अभियंता/प्रा. हयांचे मत घेऊन त्यासह प्राधिकरणाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**बाब क्रमांक : ७६.६**

विषय- दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

..................................

सदर प्रस्ताव पृ.क्र.३१३ ते ३३९ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मुख्य लेखाधिकारी हयांनी असे निदर्शनास आणले की, प्रस्तावातील पृ.क्र.३१३ वर परिच्छेद क्र.२ मध्ये जानेवारी २००१ हे चुकीने टाईप झाले असल्याने त्याऐवजी जानेवारी-२००२ अशी दुरुस्ती करावी.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया विषयाची आपणा सर्वांना कल्पना आहेच. मा. सभापती हे हयाबाबत राजकीय पातळीवर तसेच ते स्वतः प्रशासकीय पातळीवर दुरुस्ती मंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्नशील आहेत. आता नवीन वर्ष सुरु झाले असल्याने, हया चालू वर्षातील निधीच्या उपलब्धतेबाबत ते प्रतिपादन करीत नसून मागील तीन आर्थिक वर्षातील (सन १९९९-२००० ते २००१-२००२) तरतुदींचा विचार करता शासनाकडुन आपणांस अंदाजपत्रकातील तरतुदींनुसार देय रक्कम रु. १३९.४३ कोटी अद्याप प्राप्त झालेली नाही. हयाबाबत मा. सभापती हयांनी स्वतः मा. अर्थमंत्री हयांच्याशी ४-५ वेळा चर्चा केलेली आहे तसेच प्रशासकीय स्तरावर उपमुख्य अभियंता (द.) व मुख्य लेखाधिकारी हे जातीने मागील ७-८ दिवसांपासून मंत्रालयात जाऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्नशील होते तसेच त्यांनी स्वतः हयाबाबत मा. प्रधान सचिव (गृहनिर्माण) हयांच्याशी चर्चा केलेली आहे. परंतु आपल्याला शासनाकडून निधी

उपलब्ध झालेला नाही. शासनाच्याही काही अडचणी असतील. शेवटचा पर्याय म्हणून मा. प्रधान सचिवांनी सुचविल्यानुसार व जी कामे अगोदरच झाली आहेत त्या कामांची देयके अदा करण्यासाठी प्राधिकरणाने आपल्याला निधी द्यावा हयादृष्टीने हा प्रस्ताव मंडळापुढे मान्यतेसाठी सादर केला आहे. जेव्हा शासनाकडून निधी प्राप्त होईल तेव्हा प्राधिकरणाने देऊ केलेली रक्कम त्यातून वळती करुन प्राधिकरणाने घ्यावी.

हयाबाबत मा. सदस्य, श्री बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, श्री रत्नाकर महाजन हे नियोजन मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्याबरोबर हयाबाबत त्यांनी चर्चा केली असून त्यांना हयाबाबतीत एक पत्रही पाठविले आहे. त्यांना मा. अर्थमंत्र्यांबरोबर चर्चा करुन हयाबाबत लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली आहे. हयाबाबत श्री रत्नाकर महाजन हयांनी लक्ष घालून लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही केली जाईल असे सांगितले आहे. त्यांनी असेही सांगितले की, विधी मंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर दुस-या आठवडयापर्यंत जेवढा निधी उपलब्ध करुन देता येईल तेवढा उपलब्ध करुन देण्याबाबत ते कार्यवाही करतील.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असेही मत प्रदर्शित केले की, आपले मंडळ जे काम करीत आहे ते गरीब जनतेसाठीच करीत आहे. प्राधिकरणाने आपल्याला पूर्वी पैसे दिलेले आहेत. परंतु आता आपल्या मंडळाची परिस्थिती इतकी डबघाईला आलेली असताना आपणाला प्राधिकरणाला एकसारखी विनंती करावी लागते आहे ही अतिशय केविलवाणी स्थिती आहे. त्यांनी याबाबत प्राधिकरणाला अशी विनंती करण्याचे सूचविले की, आज शासनाची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने व शासन सद्यः निधी देत नसल्याने प्राधिकरणाने तात्पुरते रु. ३० कोटी मंडळास द्यावेत. शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर आमच्या मंडळास दिलेली रक्कम सदर निधीतून वळती करुन घ्यावी.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी अशी विनंती केली की,मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांची नगरसेवक म्हणून नेमणूक झाली असल्याने त्यांनी महानगरपालिकेला उपकरापोटी म.न.पा. तर्फे जी रक्कम गोळा केली जाते ती त्वरित शासनाला/मंडळाला उपलब्ध करुन देण्याबाबत मंडळास सहकार्य करावे. कारण उपकरापोटी जमा झालेला पैसा हा शासनाचा वा म.न.पा.चा नसून तो उपकरप्राप्त इमारतीत राहणा-या गरीब रहिवाशांचा पैसा आहे. त्यामुळे उपकरापोटी जमा होणारा निधी मंडळास त्वरित उपलब्ध करुन देणे कायद्याने बंधनकारक आहे. प्राधिकरण अधिनिमय १९७६ मधील तरतुदींनुसार उपकरापोटी जमा झालेला पैसा हा म.न.पा.ने १५ दिवसाच्याा आत शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी हा मुद्दा म.न.पा. च्या बैठकीमध्ये प्रकर्षाने उपस्थित करुन हा पैसा मंडळास विहित मुदतीत प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी विनंती पुन्हा मुख्य अधिकारी हयांनी केली.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मागील अधिवेशनाच्या काळात त्यांनी स्वतः मा. अर्थमंत्री श्री जयंत पाटील हयांच्याबरोबर चर्चा केली होती. त्यावेळी मा. गृहनिर्माण मंत्री श्री सय्यद अहमद हेही उपस्थित होते. त्यावेळी चर्चेमध्ये त्यांनी असे सांगितले होते की, कायद्यानुसार हा उपकराचा पैसा विहित मुदतीत मंडळास देणे आवश्यक आहे. परंतु जर त्याचे पालन झाले नाही व

जर रहिवाशी न्यायालयात गेले तर हा पैसा त्वरित मंडळास देणे शासनाला भाग पडेल. म्हणून प्रत्येक गोष्ट कायद्याने न बघता हयाबाबत मंडळास लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मा. अर्थमंत्र्यांनी स्वतः लेखापालांना बोलावून तसे आदेशही दिले होते. परंतु हया आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. हया अधिवेशनातही आपण हे प्रकरण उपस्थित करणार आहोतच. मुंबई शहरातील सर्व आमदारांची हया प्रश्नाबाबत सकारात्मक भूमिका असून मा. आमदार श्री बशिर पटेलही हा प्रश्न उपस्थित करणार आहेत. मागच्या वेळी आपण मंडळास पैसे न देण्याचे ठरलेले असतानासुध्दा प्राधिकरणास खास बाब म्हणून पैसे देण्यास भाग पाडले होते. त्यामुळे प्रत्येक वेळी प्राधिकरणास अशी विनंती करण्यापेक्षा ज्या ज्या वेळी मंडळास निधीची आवश्यकता भासेल त्या त्यावेळी प्राधिकरणाने आपणांस निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे ज्याला सर्वांची संमती आहेच. त्यामुळे हा प्रस्ताव आपण प्राधिकरणाकडे सादर करु या.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हयाबाबत कालच मा मंत्री महोदयांबरोबर बैठक झाली असून त्यावेळेस मा. आमदार श्री बशिर पटेल उपस्थित होते. त्यावेळी मा. आमदार श्री बशिर पटेल हयांनी असे सांगितले की, दरुस्ती मंडळाला निधी उपलब्ध करुन न दिल्याने त्यांच्या विभागात दुरुस्ती कामांबाबत खूप अडचणी निर्माण झालेल्या आहेत व ते १५ दिवसानंतर निधीच्या उपलब्धतेसाठी मंत्रालयासमोर उपोषणास बसणार आहेत. अशाप्रकारे आपण आतापर्यंत निधीच्या उपलब्धतेसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न केलेले आहेत. दि. ६ एप्रिल २००२ रोजी प्राधिकरणाची बैठक असून हया बैठकीत ते स्वतः तसेच मा. सभापती हेही उपस्थित राहणार आहेत. हया बैठकीत सर्व सदस्यांच्या हया प्रकरणाबाबतच्या भावना उपस्थित करुन मंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधिकरणास विनंती केली जाणार आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती हा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५८१**

दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास निधी पुरविणे बंद करण्याऐवजी गरजेनुसार आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सन्मा. सदस्यांच्या व अधिका-यांच्या भावनांसह प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**बाब क्रमांक : ७६/७**

विषय- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या कलम ९४ मधील पोट कलम (५) व (६) अन्वये पुनर्रचित इमारतीमधील गाळयांचे भोगवटाधारकांच्या सहकारी गृ.नि.संस्थाना अभिहस्तांतरण करणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.३४१ ते ३६१ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या काही तरतुदी १९९८ साली सुधारित करण्यात आल्या आहेत. या अधिनियमातील कलम ९४ नुसार (सुधारित करण्यापूर्वी) पुनर्रचित इमारतीतील गाळे आपण भाडे तत्वावर देत होतो. परंतु सुधारित कलम ९४ (५) व (६) नुसार पुनर्रचित इमारतीतील गाळे आता स.गृ.नि.संस्थां स्थापन करुन हया संस्थेस मालकी तत्वावर देण्याची तरतुद आहे. त्यामुळे मंडळाने आतापर्यंत ज्या ३२८ इमारती पुनर्रचना योजनेंतर्गत बांधल्या आहेत त्या सर्व इमारती त्यातील रहिवाशांची स.गृ.नि.संस्थां स्थापन करुन त्यांना मालकी तत्वावर देणे बंधनकारक आहे. त्यानुसार मार्च २००१ मध्ये आपण हया इमारती मालकी तत्वावर देण्याची कार्यवाही सुरु केली होती. ज्या इमारतींमध्ये ५० पेक्षा कमी गाळे आहेत अशा एकूण १३० इमारती आहेत. हया सर्व १३० इमारतीतील रहिवाशांना एकतर्फी पत्र पाठवून त्यांच्या इमारती त्यांना सुपूर्द करीत आहोत असे कळविले होते तसेच हया पत्रान्वये त्यांना असेही सूचित करण्यात आले हाते की, १ एप्रिल २००१ नंतर हया इमारतीची जबाबदारी त्यांची असून हया इमारतीच्या देखभालीचा खर्च व इतर सर्व प्रकारचे शुल्क त्यांना स्वतः द्यावे लागेल. १ एप्रिल २००१ पासून आपल्या मंडळाने त्यांच्याकडून भाडे घेणेही बंद केले होते. दरम्यानच्या कालावधीत हया इमारतीतील रहिवाशांनी इमारती मालकी तत्वावर घेण्यास विरोध करुन मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांची भेट घेतली होती व त्यांच्याकडून हया इमारती मालकी तत्वावर करण्याच्या प्रस्तावास स्थगिती मिळविली होती. त्यामुळे पुन्हा आपण हया रहिवाशांकडून भाडे घेणे चालू केले आहे. त्यानंतर दि. ६.८.२००१ रोजी मा. मंत्री, गृहनिर्माण हयांच्या अध्यक्षतेखाली एक बैठकी झाली होती. हया बैठकीस मा. अध्यक्ष/प्रा., मा. प्रधान सचिव,गृहनिर्माण विभाग, मा. उपाध्यक्ष/प्रा तसेच विधान सभेचे आमदार व इतर सदस्य उपस्थित होते. हया बैठकीत असे ठरले होते की, ज्या इमारतीमध्ये प्रत्येक गाळयाचे चटई क्षेत्रफळ हे २२५.०० चौ.फू. किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा इमारतीं फक्त मालकी तत्वावर रहिवाशांच्या स.गृ.नि.संस्थांना द्याव्यात. ज्या इमारतींमधील गाळयांचे चटई क्षेत्रफळ हे २२५.०० चौ.फू. पेक्षा कमी आहे अशा इमारती मालकी तत्वावर न करता पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे भाडे तत्वावरच ठेवाव्यात. हया बैठकीच्या निर्णयानुसार, मा. मंत्री, गृहनिर्माण महोयांनी सविस्तर प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर कण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे मंडळाने दि. ७.९.२००१ रोजी प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ९४(५) व (६) मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. परंतु अद्याप शासनाकडून कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत.

हया इमारती सद्यः भाडे तत्वावर असल्याने मंडळाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. उपलब्ध आकडेवारीवरुन असे दिसून येत आहे की, सन २०००-२००१ हया आर्थिक वर्षामध्ये हया इमारतीतील पुनर्रचित गाळयांच्या भाडयापोटी व सेवा आकार शुल्कापोटी मंडळास रु. ५.०९ कोटी मिळाले आहेत. मात्र हयाच कालावधीमध्ये हया गाळयांवर मंडळाचा झालेला खर्च हा रु. ११.४५ कोटी आहे. म्हणजेच एका वर्षात मंडळाचे रु. ६ कोटीपेक्षा अधिक आर्थिक नुकसान झालेले आहे. आपण जरी शासनाला फक्त २२५.०० चौ.फू. चटई क्षेत्रफळ किंवा त्यापेक्षा अधिक गाळयांच्या इमारती मालकी तत्वावर करण्याचा प्रस्ताव सादर केला असला तरी त्याबाबत शासनाकडून काहीच आदेश प्राप्त झाले नसल्याने अधिनियमातील सद्यःच्या तरतुदींनुसार मंडळाने बांधलेल्या सर्व ३२८ इमारती

मालकी तत्वावर करणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे आपण हया सर्व ३२८ इमारती मालकी तत्वावर करण्याचा हा प्रस्ताव असून तो मान्यतेसाठी मंडळापुढे सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सदस्य श्री मोहन देसाई हयांनी असे प्रतिपादन केले की, ज्याप्रमाणे आपण एखादी इमारत दुरुस्त केल्यानंतर दुरुस्ती उपकरात वाढ करतो त्याचप्रमाणे हया पुनर्रचित इमारती दुरुस्त केल्यानंतर त्यातील गाळयांच्या भाडयामध्ये काही प्रमाणात वाढ केली तर हया इमारतींवर केला जाणारा खर्च वसूल होण्यास मदत होऊ शकेल.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी जी वरील सूचना केली आहे ती स्वागतार्ह असून तिची नोंद घेणे आवश्यक आहे. कायद्यानुसार सद्यः सर्व इमारती मालकी तत्वावर करणे बंधनकारक आहे. फक्त २२५.०० चौ.फू. किंवा त्यापेक्षा अधिक चटई क्षेत्रफळाच्या गाळयांच्या इमारती मालकी तत्वावर कराव्यात अशी कायद्यामध्ये तरतुद नसून मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांच्या बैठकीतील सूचनेनुसार आपण तसा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याबाबत शासनाकडून अद्याप आदेश प्राप्त झालेले नाहीत.

हयाबाबत मा. सदस्य, श्री मोहन देसाई हयांनी असे प्रदर्शित केले की, हया प्रस्तावाचा संपूर्ण निर्णय मा. गृहनिर्माण मंत्री व प्राधिकरण हयांच्यावर सोपवावा.

मा. सदस्य, श्री रघुनाथ थवई हयांनी हयाबाबत असे मत प्रदर्शित केले की, मागे राजीव गांधी प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारती दुरुस्त करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळापुढे सादर केला होता. हया प्रस्तावात असे दिसून आले होते की, रहिवाशी त्यांच्या इमारती मालकी तत्वावर घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे हयाबाबतचा निर्णय आपल्या मंडळाने न घेता प्राधिकरणाने घेणे उचित होईल असे वाटते.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, सदर प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करताना त्यात स्पष्ट उल्लेख करावा की, हयाबाबत मा. गृहनिर्माण मंत्री महोदय हयांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील मुद्दयांच्या आधारावर हा प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्यात येत आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांबरोबर झालेल्या बैठकीत, फक्त २२५.०० चौ.फू. किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रपफळाच्या गाळयांच्या इमारती मालकी तत्वावर करण्याचे प्रस्तावित केले होते. ज्यावेळी मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग हयांच्याकडे निधीच्या उपलब्धतेबाबत चर्चा चालू होती त्यावेळी त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, जर हया सर्व इमारती भाडे तत्वावर ठेवल्याने मंडळास आर्थिक नुकसान होत आहे तर कायद्यातील तरतुदींनुसार हया सर्व इमारती आतापर्यंत मालकी तत्वावर का केल्या नाहीत. त्यावेळी आपण त्यांना असे सांगितले होते की, हयाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून शासनाकडूनच त्याबाबत अद्याप आदेश प्राप्त न झाल्याने पुढील कार्यवाही करता येत नाही. मा. सभापती महोदयांनी सुचविल्यानुसार आपण प्रस्ताव प्राधिकरणापुढे निर्णयासाठी पाठवू.

वरील सविस्तर चर्चेअंती, विषयांकित प्रस्ताव प्राधिकरणाकडे निर्णयासाठी सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

२८

**ठराव क्रमांक : ७६/५८३**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या कलम ९४ मधील पोट कलम (५) व (६) अन्वये पुनर्रचित इमारतीमधील गाळयांचे भोगवटाधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरण करण्याचा प्रस्ताव मा. गृहनिर्माण मंत्री हयांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील मुद्यांच्या आधारावर प्राधिकरणापुढे निर्णयासाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

**बाब क्रमांक : ७६.८**

विषय- **मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय.**

१) विषय- **मुंबई व उपनगरातील मिल व कारखान्यांमध्ये आणि संक्रमण शिबीरात राहणा-या सर्वसामान्य जनतेसाठी जीवनावश्यक व गृहोपयोगी वस्तू रास्त दरात पुरवठा करण्यासाठी संक्रमण शिबीरात स्वयंसेवा विभाग कार्यरत करणेबाबत.**

---

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, उपाध्यक्ष, राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ (मर्या.), परेल, मुंबई यांनी अशी मागणी केली आहे की, मुंबई व उपनगरातील मिल व कारखान्यांमध्ये व संक्रमण शिबीरात राहणा-या सर्वसामान्य जनतेसाठी जीवनाश्यक व गृहोपयोगी वस्तू रास्त दरात पुरवठा करण्यासाठी मंडळाकडील मानखूर्द, नविन पी.एम.जी.पी.वसाहत येथील संक्रमण शिबीरातील ८ गाळे भाडे तत्वावर द्यावेत. वस्तुतः ही मागणी त्यांनी एक ते दीड वर्षापूर्वीपासूनच केलेली आहे. परंतु आतापर्यंत आपण त्यांना जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रस्तावात असे नमूद केले आहे की, हया संक्रमण शिबीरात एकही गाळा रिक्त नाही. त्यामुळे मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, हया संक्रमण शिबीरात जे घुसखोर आहेत त्यांना निष्कासित करुन गाळे देता येतील का?

हयाबाबत सहमुख्य अधिकारी यांनी असा खुलासा केला की, मानखूर्द संक्रमण शिबीरातील ४५ गाळे भविष्यकाळात खाली होणार आहेत. याशिवाय हया संक्रमण शिबीरात १५ गाळयांमध्ये घुसखोर व्यक्ती राहात आहेत. त्यामुळे हया १५ गाळयांपैकी ८ गाळे खाली करुन आपण हया ग्राहक संघास देऊ शकतो.

हयाबाबत मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनी अशी विचारणा केली की, आपण हे जे गाळे देणार आहोत ते सहकारी तत्वावर देणार आहोत की खाजगी तत्वावर देणार आहोत? त्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे सांगितले की, हे गाळे आपण सहकारी तत्वावर भाडयाने देणार आहोत.

हयाबाबत मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी असे मत प्रदर्शित केले की, मागे आपण ज्याप्रमाणे कुलाबा येथील शाळेसाठी गाळे करारपत्र करुन भाडेतत्वावर दिले आहेत त्याचप्रमाणे हया प्रकरणातही गाळे भाडे तत्वावर देण्यास हरकत नाही.

वरील सविस्तर चर्चेअंती मानखूर्द संक्रमण शिबीरातील ८ गाळे भाडे तत्वावर प्रस्तावात नमूद केल्यानुसार देण्याचे सर्वानुमते ठरले.

२८

**ठराव क्रमांक : ७६/५८४**

राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ, परेल, मुंबई हयांना मिल, कारखाने व संक्रमण शिबीरात राहणा-या सर्वसामान्य जनतेला जीवनावश्यक व गृहोपयोगी वस्तूंचा पुरवठा, स्वयंसेवा विभाग कार्यरत करुन, करण्यासाठी मानखूर्द, नवीन पी.एम.जी.पी. वसाहत येथील संक्रमण शिबीरातील ८ गाळे नियमानुसार रु.५०००/- अनामत रक्कम व रु. ६००/- प्रतिमाह प्रती गाळा भाडयाने ३ वर्षाचे आगाऊ भाडे घेऊन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

२) विषय- **इमारत क्र. ८६-११०, ९४ए, ९४बी, टी.बी.कदम मार्ग, झेनाब बिल्डिंग, ई.विभाग हया इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामाची निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत.**

---

उपरोक्त प्रस्ताव मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी सभागृहास सादर करुन त्यांनी असे प्रतिपादन केले की, हया कामाच्या निविदेची रक्कम रु.२१५०२२८४/- आहे. एकूण ५ ठेकेदारांकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. निम्नतम दराची निविदा ही मे. कैलास महादेव आणि कं. हयांची असून त्यांचा दर निविदा रक्कमेपेक्षा १३.५० टक्के अधिक आहे. आतापर्यंत आपण ज्या निविदा स्विकृत केल्या आहेत त्या साधारणपणे ९ ते ९.५० टक्के अधिक दराने स्विकृत केल्या आहेत. त्यामुळे हया निम्ततम ठेकेदाराबरोबर आपणास त्याचा दर कमी करण्यासाठी वाटाघाटी कराव्या लागणार आहेत. परंतु प्राधिकरणाने दि. २५.०२.२००२ रोजीच्या बैठकीत एक ठराव केला असून हया ठरावामध्ये असे नमूद केले आहे की, ज्या कमी दराच्या निविदा वाजवी असतील अशा निविदांबाबत कोणत्याही वाटाघाटी न करता त्या मंजूर कराव्यात व जर कमी दराच्या निविदा वाजवी नसतील तर फेर निविदा मागवाव्यात. हयाप्रमाणे प्राधिकरण व सर्व विभागीय मंडळाने कार्यवाही करण्याच्या सूचना हया ठरावाव्दारे देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता आपणांस ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करता येणार नाहीत. यामुळे व आपण हयापूर्वी ९ ते ९.५० टक्के अधिक दराने निविदा मंजूर केल्या असल्याने ही निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्याचे प्रस्तावित केले आहे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाच्या वरील ठरावाची अंमलबजावणी करावयाचे ठरविल्यास प्रत्येक निविदा नव्याने पुन्हा पुन्हा मागवावी लागेल. दुरुस्ती कामांच्या निविदांची रक्कम ही कमी असते व त्यामुळे अशाप्रकारे फेरनिविदा मागविल्यास निविदा रक्कमेपेक्षा निविदा मागविण्याचा खर्च अधिक होईल. हा खर्च मंडळाला परवडेल का? हयाबाबत साशंकता वाटते. त्यामुळे हयाबाबत आपण प्राधिकरणास विनंती करु या की, ठेकेदाराबरोबर निम्नतम दराच्या वाटाघाटी करण्यास परवानगी द्यावी.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे मत व्यक्त केले की, अधिकारी या नात्याने निम्नतम ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करण्याचे अधिकार निदान मंडळास द्यावेत. परंतु प्राधिकरणाच्या वरील निर्णयामुळे वाटाघाटी करता येत नसल्याने आपणांस हया निविदा रद्द करुन फेर निविदा मागविण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. मा. सभापती महोदयांनी सुचविल्यानुसार निम्नतम दराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करण्याचे अधिकार मंडळास देण्याबाबतच्या भावना प्राधिकरणास कळवाव्या लागतील.

हयाबाबत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या दृष्टीने ९ ते ९.५० टक्के अधिक दराने निविदा मंजूर करणे वाजवी आहे. परंतू प्राधिकरणाच्या दृष्टीने अवाजवी दर काय आहे असा मुद्दा उपस्थित होतो. त्यामुळे ९.५० टक्क्यापेक्षा अधिक दराच्या निविदा आपणांस रद्द करुन फेरनिविदा मागवाव्या लागतील. जो ठेकेदार वाटाघाटी करुन ९.५० टक्के दराने काम करण्यास तयार असेल अशा ठेकेदाराबरोबर वाटाघाटी न करणे हे अत्यंत चुकीचे आहे. फेरनिविदा मागवून पुन्हा निम्नतम निविदा ९.५० टक्क्यापेक्षा अधिक दराने भरल्यास पुन्हा नव्याने निविदा मागवाव्या लागतील. त्यामुळे फेर निविदा कितीवेळा आपण मागविणार. हया परिस्थितीत मा. सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने असे मत व्यक्त केले की, वास्तविक वाटाघाटी करणे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे.प्राधिकरणाच्या निर्णयामुळे निष्कारण फेरनिविदा मागवून अनावश्यक खर्च करावा लागणार आहे.हया गोष्टीची गरजच नाही. त्यामुळे आपण प्राधिकरणाला हयाबाबत फेरविचार करण्याची विनंती करु.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, सद्यः जो प्रस्ताव मंडळापुढे सादर केला आहे त्यानुसार आपण दुस-यांदा निविदा मागवित असल्याने निविदा सादर करण्याचा कालावधी कमी करुन तो १५ दिवसांचा असणार आहे. त्यामुळे आपला वेळ वाचून लवकर निर्णय होण्यास मदत होईल.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, प्राधिकरणाची बैठक दि. ६.४.२००२ रोजी होणार आहे. त्यावेळी ते हयाबाबत बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित करुन वाटाघाटी करण्यास परवानगी देण्याबाबत प्रयत्न करतील. तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. मात्र हयाबाबत मंडळाच्या पुढील बैठकीची वाट न पाहता प्राधिकरणाने जर वाटाघाटी करण्यास परवानगी दिली तर हया निविदा वाटाघाटी करुन ९.५० टक्के अधिक दराने मंजूर कराव्यात व जर प्राधिकरणाने वाटाघाटी करण्यास परवानगी दिली नाही तर फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही चालू करावी.

तदनंतर उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.४९-४९ए, ५१-५३, के.के.मार्ग हया इमारतीच्या पुनर्रचना कामाच्या निविदा दि.२.४.२००२ रोजी उघडण्यात आल्या आहेत. हया कामाच्या निम्नतम निविदेचा दर १४.५० टक्के अधिक आहे. कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने हया कामाच्या निविदेबाबतही आपण वरीलप्रमाणे कार्यवाही करावी अन्यथा हया कामाच्या निविदा मंडळाच्या पुढील बैठकीत सादर कराव्या लागतील.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रस्तावित केले की, प्राधिकरणाची बैठक दि.६.४.२००२ रोजी असून मा.सभापती महोदय सदर बैठकीस उपस्थित असणार आहेत. हया बैठकीमध्ये हया प्रकरणाबाबत चर्चा करुन जो निर्णय होईल त्याप्रमाणे मा. सभापती मंडळाच्या वतीने निर्णय घेतील. त्यामुळे मंडळाच्या पुढील बैठकीची वाट न पाहता उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी ८ किंवा ९ तारखेला मा. सभापती हयांच्याशी सल्लामसलत करुन हया दोन्ही निविदांबाबत पुढील कार्यवाही करावी.

मुख्य अधिकारी, दु.व पु. मंडळ हयांनी तदनंतर असेही प्रतिपादन केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार तसे शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार,

निम्नतम दराच्या ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करुन त्याच्या निविदेचा दर जर कमी केला तर त्यामध्ये शासनाचा/प्राधिकरणाचा/मंडळाचा आर्थिक फायदा होत असतो. व त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व शासनाच्या नियमांनुसारच आपण वाटाघाटी करीत असतो. मात्र प्राधिकरणाने जो निर्णय घेतला आहे तो शासनाच्या वा सार्वजनिक बांधकामाच्या नियमावलींचा विचार करुन घेतला आहे किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. मात्र प्राधिकरणाचा निर्णय हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तसेच शासनाच्या निर्णयाशी विसंगत आहे असे वाटते. त्यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, त्यांनी हयापूर्वी शासनाच्या अन्य कार्यालयांत कामे केली असून त्याठिकाणी वाटाघाटी करुनचनिविदा मंजूर केल्या गेल्या आहेत. ब-याचवेळा ज्या ठिकाणी जिल्हा परिषदेची जी मंडळे असतात ते कमी रक्कमेच्या निविदांबाबत वाटाघाटी करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना देतात. त्यामुळे आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीतील तरतुदीसह व शासनाच्या निर्णयांच्या प्रतींसह प्राधिकरणाचा निर्णय फेर विचारासाठी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्याकडे पाठवू. तसेच वरील मुद्दयांच्या तपशीलासह एक टिपणी तयार करुन ती मा. सभापती महोदयांना द्यावी जेणेकरुन ते प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये हे मुद्दे उपस्थित करु शकतील. तसेच मुख्य अधिकारी हयांनी उपमुख्य अभियंता हयांना असेही आदेश दिले की, टिपणी तयार करताना त्यामध्ये आपण मागील मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर केलेल्या निविदांबाबत वाटाघाटी करुन प्राधिकरणाचा तसेच मंडळाचा कसा आर्थिक फायदा केला आहे याचीही आकडेवारी द्यावी. तसेच त्यामध्ये असेही नमूद करावे की, इतर मंडळांमध्ये वर्षाला फक्त १० कामांच्या निविदा मागविल्या जात असतील. परंतु हया मंडळामध्ये रोजच सरासरी ३-४ निविदा मागविल्या जातात. त्यामुळे कामाची व्याप्ती लक्षात न घेता वारंवार फेरनिविदा मागविणे हया मंडळास शक्य होणार नाही. अशाप्रकारे वरील सर्व मुद्दयांचा समावेश करुन सविस्तर टिपणी प्राधिकरणाकडे मुख्य अभियंता-२/प्राधिकरण हयांच्यामार्फत पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५८५**

वरील सविस्तर चर्चेअंती खालील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

१. दि. ६.४.२००२ रोजी प्राधिकरणाची बैठक होईपर्यंत इ.क्र.८६-१०६, ९४ए, ९४बी, टी.बी.कदम मार्ग व इ.क्र. ४९-४९ए, ५१-५३, के.के. मार्ग हया इमारतींच्या पुनर्रचनेच्या कामाच्या निविदा प्रलंबित ठेवाव्यात.

२. प्राधिकरणाच्या दि. ६.४.२००२ रोजी होणा-या बैठकीतील हया प्रकरणाबाबतच्या निर्णयानंतर मंडळाच्या पुढील बैठकीची वाट न पाहता उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी मा. सभापती महोदयांशी सल्लामसलत करुन हया दोन्ही कामांच्या निविदांबाबत पुढील कार्यवाही करावी,

---

३) विषय- **मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

---

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ६ प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयामध्ये मा.अध्यक्षांच्या परवानगीने मंजूरीसाठी सादर केलेले आहेत.

१. भुकर पहाणी क्र. ५९५ व ५९६ भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-३५३२ व सी-३५३३ इ. क्र.१८-२० व २२-२४,महादेव शंकर लेन, चिरा बाजार, मुंबई येथील सागरी विनियमांतर्गत बाधित असलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र. १०७, कुलाबा विभाग, उपकर क्र.अे-२२५ (१६) इ. क्र. ११, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील **दमाणी हाऊस** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र. १/११८, परेल शिवडी विभाग, उपकर क्र.एफ-१०४९(२) इ. क्र.१३३ एच,डॉ. एस.एस.राव रोड, मुंबई येथील **मेघवाडी** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र. १४८४, गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१८२-८३, इ.क्र.९६-९८,जे.एस.एस. रोड,मुंबई येथील **शिंगणे बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

५. अंतिम भूखंड क्र.१०८४ नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, उपकर क्र. जी-३०११(२) क्र.१५८, प्रपोज्ड फोरस रोड, प्रभादेवी,मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.२२३३, विभाग उपकर क्र.सी-४३७१-७३, इ.क्र.४,घसवाडी, ठाकूरव्दार,मुंबई येथील **मानकर हाऊस** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

---

वरील सर्व प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरु/रहिवाशांची संमती असून मालमत्ताधारक/मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे. क्षेत्रीय अधिका-यांनी रहिवाशांची यादी त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ तसेच संमतीपत्रे तपासून प्रमाणित केलेली आहेत. त्यामुळे सदर प्रस्तावांमध्ये प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींवर ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नसावी.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील **अ** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याच्या अ.क्र.१ ते ६ वर सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून सर्वानुमते ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ७६/५८६**

मुंबई बेटावरील **अ** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाठी मालमत्ताधारक/मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ६ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधिन राहून **ना हरकत प्रमाणपत्र** प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र. ५९५ व ५९६ भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-३५३२ व सी-३५३३ इ. क्र.१८-२० व २२-२४,महादेव शंकर लेन, चिरा बाजार, मुंबई.

२. भुकर पहाणी क्र. १०७, कुलाबा विभाग, उपकर क्र.ॲ-२२५ (१६) इ. क्र. ११, कफ परेड, कुलाबा, मुंबई येथील **दमाणी हाऊस**.

३. भुकर पहाणी क्र. १/११८, परेल शिवडी विभाग, उपकर क्र.एफ-१०४९(२) इ. क्र.१३३ एच,डॉ. एस.एस.राव रोड, मुंबई **मेघवाडी** .

४. भुकर पहाणी क्र. १४८४, गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१८२-८३, इ.क्र.९६-९८,जे.एस.एस. रोड,मुंबई **शिंगणे बिल्डिंग**.

५. अंतिम भूखंड क्र.१०८४ नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, उपकर क्र. जी-३०११(२) क्र.१५८, प्रपोज्ड फोरस रोड, प्रभादेवी मुंबई.

६. भुकर पहाणी क्र.२२३३, विभाग उपकर क्र.सी-४३७१-७३, इ.क्र.४,धसवाडी, ठाकूरव्दार,मुंबई **मानकर हाऊस**.

---

तद्नंतर आयत्यावेळच्या विषयामध्ये, मा सदस्य, श्री रघुनाथ थवई हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, भागीरथी भुवनच्या पुनर्रचनेच्या कामाबाबत पुढे काय कार्यवाही केली जाणार आहे याची माहिती रहिवाशांना हवी आहे. आपण रहिवाशांना असे सांगितले आहे की, भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाबाबत मा. सभापती महोदयांनी हयाच सभागृहात सर्व रहिवाशांबरोबर दोनदा सविस्तर चर्चा केलेली आहे. हया इमारतीतील काही रहिवाशांनी स्थलांतर केले असून काही रहिवाशी स्थलांतर करीत नव्हते. रहिवाशांचे व इमारत मालकांचे आपापसात मतभेद असून आपण त्यांना असे सांगितले होते की, त्यांना जर पुनर्विकास करावयाचा असेल तर त्यांनी एकत्र येऊन तसा प्रस्ताव सादर केल्यास ना.ह.प्र. पत्र दिले जाईल तसेच हया चर्चेमध्ये आपण त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दोन्ही पर्याय दिलेले आहेतच. एकतर मंडळाकडून पुनर्रचना केली जाईल वा त्यांनी पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केल्यास

नियमानुसार त्यास परवानगी दिली जाईल. आपण पुनर्रचनेची कार्यवाही सुरु केलेली असून नियोजित इमारतीचे नकाशेही तयार करीत आहोत. त्यामुळे मंडळामार्फत हया इमारतीच्या पुनर्रचनेची कार्यवाही चालू केलेली आहेच.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीबाबत मा. न्यायालयात निर्णय झाला असून त्यानुसार इमारत पाडण्यास आदेश दिलेले आहेत. मात्र अद्याप न्यायालयाच्या निर्णयाची प्रत प्राप्त झालेली नाही. इमारत पाडण्यास आपण इमारत मालकास ना.ह.प्र.पत्र दिलेले आहेच. निर्णयाची प्रत प्राप्त होताच इमारत पाडण्याची कार्यवाही सुरु केली जाईल.

मा. सदस्य, श्री रमेश परब हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, तपोवन बिल्डिंग येथील अरुण क्रिडा मंडळ, सेनापती बापट मार्ग हयानी हया ठिकाणी बालवाडी, अभ्यासिका व व्यायाम शाळा हयासाठी बांधकाम करण्यास परवानगी मागितली आहे. हया संदर्भात मागील बैठकीत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी हया बांधकामास आक्षेप घेतले होते. त्या अनुषंगाने हया क्रीडा मंडळाच्या सदस्यांनी व्यक्तीशः भेट घेऊन सदर परवानगी मागितली आहे.

हयाबाबत मा. सदस्य, श्री. सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, त्यावेळी क्रिडा मंडळाने केलेले बांधकाम हे अनधिकृत होते व त्यामुळे त्यांनी त्यास आक्षेप घेतले होते. आता मात्र त्यांनी रितसर परवानगी मागितली असल्याने त्यांना ती देण्यास काही हरकत नसावी.

हयाबाबत का.अ./पु.वि.३ हयांनी असे प्रतिपादन केले की, हया क्रिडा मंडळाने अद्याप तसा प्रस्ताव व नकाशा सादर केलेला नाही. त्यामुळे हया बैठकीत कार्यसूचीमध्ये हा प्रस्ताव सादर करता आलेला नाही.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, क्रीडा मंडळाकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तो मंडळाच्या बैठकीपुढे मान्यतेसाठी सादर करावा.

---

मा. सदस्य श्री रमेश परब हयांनी तदनंतर आयत्यावेळच्या विषयामध्ये असा मुद्दा उपस्थित केला की, एलफिन्स्टन रोड येथील गुलाम मोहमद चाळ आणि साबुवाला चाळ हयाबाबत अनेक वेळा मुख्य अधिकारी व उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांच्याशी चर्चा केली आहे. हया इमारतींची पुनर्रचना लवकरात लवकर झाल्यास बरे होईल. हया जागेवर ज्या झोपडया निर्माण झाल्या होत्या त्या झोपडपट्टीधारकांना आपण जर जागा दिल्या तर हया इमारतींच्या पुनर्रचनेच्या कामास गती प्राप्त होण्यास मदत होईल. हयाबाबतीत बराचसा कालापव्यय झाला असल्याने लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती मा. सदस्य श्री रमेश परब हयांनी केली.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, हया जागेवरील झोपडपट्टीधारकांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. सुरवातीला हे प्रकरण ट्रिब्युनलमध्ये गेले होते. आणि त्यामध्ये हे झोपडपट्टीधारक जिंकले होते. हयासाठी मंडळाने अपिल दाखल केले होते. मंडळाच्या अपिलावर हया झोपडपट्टीधारकांनीही न्यायालयात अपिल दाखल केले आहे. हयाबाबत मा. न्यायाधीशांनी असे सांगितले आहे की, ही तिन्ही न्यायालयीन प्रकरणे एकत्र करुन त्यांच्यापुढे

आणल्यानंतर ते हयाबाबत सुनावणी घेतील. लवकरच हया प्रकरणाबाबत न्यायालयात सुनावणी होण्यी शक्यता आहे. सद्यः हे प्रकरण न्यायालयात असल्याने हया जागेवरील झोपडपट्टीधारकांना आपण स्थलांतरित करु शकत नाही.

हयाबाबत मा. सदस्य, श्री. रमेश परब हयांनी असे प्रतिपादन केले की, हया जागेवर अंदाजे १४ झोपडपट्टया आहेत. हया १४ झोपडपट्टीधारकांना जर आपण घरे दिली तर पुनर्रचना योजनेचे काम आपणांस सुरु करता येईल. कारण ही योजना त्यामुळे ब-याच दिवसापासून रखडलेली आहे.

हयाबाबत मा. सभापती हयांनी विचारल्यानुसार उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, हया झोपडपट्टीधारकांनी आपल्या जागेवर अतिक्रमण केले आहे व ते१९९५ पूर्वीपासून हया जागेवर राहात असल्याने मंडळाने त्यांना जागा द्यावी अशी त्यांची मागणी आहे. हयाबाबतच त्यांनी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे.

हयाबाबत का.अ./पू.वि.३ हयांनी असे प्रतिपादन केले की, न्यायालयात एकूण तीन प्रकरणे दाखल असून ही तिन्ही प्रकरणे एकत्र करुन त्याबाबत मा. उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. हयाशिवाय हयाबाबत मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण हयांच्याकडे एक बैठक झाली असून त्यांच्या आदेशानुसार हया झापेडपट्टीधारकांची पात्रतेची फेरतपासणी चालू आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, इमारतीतील मूळ भाडेकरुंनी मा. आमदार श्री दत्ताजी नलावडे हयांच्यासह मा. गृहनिर्माण मंत्र्यांची भेट घेतली असून मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांच्या आदेशानुसार ही फेर तपासणी करण्याचे काम मा. जिल्हाधिकारी, मुंबई हयांच्या कार्यालयामार्फत चालू आहे.

हयाबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, हे प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने त्याबाबत न्यायालयाचा निर्णय लवकर प्राप्त करुन घेण्याबाबत ते विधी सल्लागार/प्रा. हयांच्याशी लवकरच चर्चा करुन त्याना कार्यवाही करण्यास सांगतील. हया प्रकरणांत मुळ भाडेकरु, झोपडपट्टीधारक व मंडळ हयांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले असल्याने त्यामध्ये लवकर निर्णय होण्याची शक्यता नाही. त्यामुळे हयाबाबत न्यायालयाला किंवा न्यायाधीशांच्या बेंचपुढे हे प्रकरण नेऊन त्याबाबत लवकरच निर्णय देण्याची विनंती करावी लागेल. कारण ही पुनर्रचना योजना १२ वर्षापासून रखडली आहे.

मा. सभापती यांनी असेही प्रतिपादन केले की, मोकळया जागेवर अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आपण मागे असा निर्णय घेतला आहे की, संपूर्ण इमारत न पाडता तळ मजला तसाच ठेवावा. हा आपण चांगला निर्णय घेतला आहे. तळ मजल्यावर सर्वसाधारणतः व्यापारी गाळे असतात. हयाबाबत असे निदर्शनास आले आहे की, आपण जेव्हा पुनर्रचनेची/भूसंपादनाची कार्यवाही सुरु केलेली असते तेव्हा अशा तळ मजल्यावरील व्यापारी हे सुध्दा न्यायालयात धाव घेऊन दावा दाखल करतात. हयापाठीमागे हया व्यापा-यांचा उद्देश असा असतो की, त्यांचा व्यापारा गाळा तोडल्यास त्यांचा व्यापार बंद होतो. ज्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होते. हयासाठी व्यापारी त्याचा व्यापारी गाळा जास्तीत जास्त वेळ न पाडण्यासाठी न्यायालयामार्फत विरोध करीत असतात. हयामुळेही पुनर्रचना योजना रखडली जाते. हा सर्वांचा परिणाम असा होतो की, जे मूळ भाडेकरु सक्रमण

शिबीरात राहावयास गेलेले असतात त्यांना वर्षानुवर्षे संक्रमण शिबीरात राहावे लागते.त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे कशी कमी करता येतील यादृष्टीने आपण विचार करणे आवश्यक आहे. अतिक्रमण होऊ नये म्हणून तळमजला न पाडण्याचा आपण जो निर्णय घेंतला आहे तो चांगला आहे. परंतु जर तळ मजल्यावरील व्यापारी कालांतराने न्यायालयात जाऊन पुनर्रचना योजनेमध्ये अडचणी निर्माण करीत असतील तर त्याबाबत पुनर्रचना विभागाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. पटेल बिल्डिंगचे उदाहरण देताना मा. सभापती महोदयांनी असे सांगितले की, हया इमारतीतील रहिवाशांच्या मागे लागून आपण सर्व रहिवाशांना पोलीसांच्या मदतीने स्थलांतरित केले आहे. परतु सद्यः तळ मजल्यावर राहणा-या फक्त १०-१२ दुकानदारांमुळे हया इमारतीची पुनर्रचना योजना रखडली आहे. त्यामुळे हा जो पुनर्रचना योजनेस विलंब होतो त्यास कोणाला जबाबदार धरावयाचे? हयामुळे त्याबाबतही आपणांस धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, ज्याअन्वये येथून पुढे तळ मजला तसाच ठेवावयाचा किंवा पाडावयाचा हयाबाबत निर्णया घ्यावा लागेल.

हयाबाबत मा. सदस्य श्री सावंत हयांनी अशी विचारणा केली की, हे झोपडपट्टीधारक त्यांच्या जागा सोडावयास का तयार नाहीत?

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हे झोपडपट्टीधारक त्यांच्या जागा सोडण्यास तयार होतील. परंतू ते अशी मागणी करतील की, त्यांना म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ७७ अन्वये जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात याव्यात. आपण जर जागा खाली करण्याची नोटीस दिली तर सद्यः जे न्यायालयात प्रकरण दाखल आहे त्याला काही अर्थच राहणार नाही.

हयाबाबत मा. सभापती महोदयांनी असे प्रतिपादन केले की, हे झोपडपट्टीधारक जर किंमत भरावयास तयार नसतील तर याचा अर्थ त्यांना मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांचा निर्णय मान्य नाही. आपण हया झोपडपट्टीधारकांना त्यांच्या जागा खाली करण्यास सांगू. पी.ए.पी. च्या प्रकरणामध्ये शासन अशा झोपडपट्टीधारकांची जबाबदारी घेते परंतू हया प्रकरणात शासन जबाबदारी घ्यावयास तयार नाही.

---

मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, १ एप्रिल २००२ रोजी प्राधिकरणातील बरेचसे अधिकारी निवृत्त झाले आहेत. त्यामुळे काही अधिका-यांवर त्यांच्या कामाव्यतिरिक्त दोन-तीन अधिका-यांचा कार्यभार सोपविला आहे. त्यामुळे बरचसे अधिकारी कामाच्या व्यापामुळे उपलब्ध होत नाहीत व त्यांच्यावर कामाचा ताण पडतो.

हयाबाबत मा. सभापती महोदयांनी असे प्रतिपादन केले की, हा विषय विचाराधीन आहे. परंतू एखादा अधिकारी निवृत्त झाल्यानंतर त्याचा कार्यभार लगेच दुस-या अधिका-यांना द्यावाच लागतो. मा. सभापती हयांनी असेही प्रतिपादन केले की, मंडळाचे जे अधिकारी (श्री वेणेगावकर, श्री . भट, श्री. करंदीकर, श्री. जाधव इत्यादी) नुकतेच सेवामुक्त झाले. त्यांचा निरोप समारंभ युनीयच्या

कार्यालयामध्ये करण्यात आला होता. त्यावेळी मंडळाचा सभापती हया नात्याने तेही हया कार्यक्रमास उपस्थित होते.

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या काही कार्यालयांमध्ये कर्मचारीवर्ग खूप अपूरा आहे. हयामुळे एकाच अधिकारी/कर्मचा-यावर कामाचा खूप ताण पडतो. त्यामुळे हयाबाबत सचिव पातळीवर चर्चा करुन, रिक्त जागी कर्मचा-यांच्या नेमणूका करणे आवश्यक आहे. आता पावसाळा सुरु होणार असून उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षणही सुरु झालेले आहे. हयामुळेही मंडळातील अधिका-यांवर अतिरिक्त कार्यभार पडत आहे.

हयाबाबत मा. सभापती महोदयांनी असे प्रतिपादन केले की, रिक्त जागा भरण्याबाबत त्यांनी हयापूर्वीच प्राधिकरणाला विनंती केली आहे. परंतु प्राधिकरणाचे असे म्हणणे आहे की, शासनाच्या आदेशांमुळे प्राधिकरणास नवीन कर्मचा-यांची नियुक्ती करता येत नाही. प्राधिकरणाच्या कर्मचारी संघटनेतर्फेही नवीन कर्मचा-यांच्या नेमणूका करण्याबात निवेदन दिलेले आहे. हयाबाबत प्राधिकरणाला आपण अशीही विनंती केलेली आहे की, ज्या मंडळामध्ये काम कमी आहे तेथील कर्मचारीवर्ग कमी करुन त्यांची नियुक्ती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामध्ये करावी. मुंबई मंडळामध्ये दोन-चार योजना सोडल्या तर तेथे काहीच काम नाही. त्यामुळे मुंबई मंडळातील काही कर्मचा-यांची नेमणूक दुरुस्ती मंडळात करण्याची विनंती केलेली होती. परंतु हयाबाबत मुंबई मंडळाने विरोध केल्यामुळे पुढे कार्यवाही झाली नाही. शेवटी हयाबाबतचा निर्णय प्राधिकरणाच्या स्तरावर घेण्याचे ठरले होते. परंतु प्राधिकरणाने अद्याप काहीच कार्यवाही केलेली नाही. हयाबाबत मा. सभापती महोदयांनी मुख्य अधिकारी हयांना अशी विनंती केली की, त्यांनी हयाबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याबरोबर व्यक्तीशः चर्चा करुन दुरुस्ती मंडळामध्ये अतिरिक्त कर्मचारी/अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांना विनंती करावी.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनीही असे मत प्रदर्शित केले की, दुरुस्ती मंडळामध्ये कर्मचारी/अधिकारीवर्ग अपूरा असल्याने अतिरिक्त कर्मचारी/अधिकारी वर्गाची नियुक्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळाचे प्रशासन व कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या नेमणूका/बदल्या करणे हया बाबी प्राधिकरणाच्या अखत्यारित येतात. शासनाने नवीन कर्मचा-यांच्या नियुक्त्या न करण्याचे स्पष्ट आदेश दिले असल्याने प्राधिकरणापुढे असा प्रश्न आहे की, सर्व मंडळामध्ये कर्मचारी/अधिकारी वर्ग समप्रमाणात कसा कमी करावा. शासनाने सद्यः असेही आदेश दिले आहेत की, शासनातील कार्यरत एकूण २९००० कर्मचारी/अधिकारी वर्ग कमी करावा. प्राधिकरणातील मुंबई मंडळामध्येच सर्वात जास्त कर्मचारी/अधिकारी वर्ग आहे. त्यामुळे आपणांस प्राधिकरणाला विनंती करावी लागेल की, मुंबई मंडळातील संबंधित श्रेणीतील कर्मचारी/अधिकारी वर्ग कमी करुन त्यांच्या नेमणूका दुरुस्ती मंडळात कराव्यात.

---

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये इंटरनेटवर प्राधिकरणाच्या वेबसाईटबाबत माहिती देण्यांत आली होती. हयाबाबतची सद्य:स्थिती काय आहे.

हयाबाबत का.अ./सह.संस्था कक्ष हयांनी असे सांगितले की, हयाबाबत मा. सभापती महोदयांशी चर्चा करुन हया वेब साईटला अंतिम स्वरुप देण्याची कार्यवाही चालू असून त्याबाबतचा निर्णय मंडळाच्या पुढील बैठकीपर्यंत होईल.

---

तदनंतर मा. सभापती महोदयांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळाचे सदस्य श्री गजेंद्र लष्करी हे महापालिकेचेही सदस्य असून नुकतीच त्यांची स्विकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मंडळाचे जे प्रश्न म.न.पा.शी संबंधित असतात ते प्रश्न लवकर सोडविण्यासाठी मा.सदस्य श्री गजेंद्र लष्करी हे मंडळास सर्वतोपरी सहकार्य करतील अशी त्यांच्याकडून अपेक्षा करु या.

बैठकीच्या शेवटी मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, मंडळाचे कर्मचारी/अधिकारी वर्ग हयांचे आभार मानून मंडळाची आजची बैठक संपल्याचे जाहीर करुन पुढील बैठक दि. ३.५.२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल असे सांगितले.

सचिव/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा.सभापती/मुं.इ.दु. व पु.मंडळ

## परिशीष्ट "अ"

**मंडळाच्या दिनांक ३/४/२००२ रोजी ७६ व्या झालेल्या बैठकीत मंजूर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांची यादी.**

| अ.क्र. | इमारतीचा तपशिल | दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ दुरूस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम निविदा रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **अ विभाग** | | | | | | | | | |
| १. | ५२ मिंट बँक रोड, फोर्ट | तिसरा मंडळ | तळ ± ३<br>२० + ४ = २४ | १००७.१३<br>८५७.२६ | ८६३३७२.०० | ५७१३७२.००<br>३६७२२९.०० | ५७१३७२.०० | -- | मंजूर |
| २. | ५-५ बी कोळी लेन, कुलाबा, | पहिला मंडळ | तळ ± १<br>५ + ० = ५ | ९२.३४<br>९९०.२५ | ९१४४०.०० | ९१४४०.००<br>७४०४८.०० | ९१४४०.०० | - | मंजूर |
| **ब विभाग** | | | | | | | | | |
| ३. | २२ खडक स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ ± २<br>८ +४ = १२ | ३२७.०४<br>९६८.९५ | ३१६८८८.०० | १५१९३१.००<br>९७७७६.०० | १५१९३१.०० | - | मंजूर |
| ४. | ५७-६३ सारंग स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ ±४<br>२९ + १५ = ४४ | १५८५.५७<br>९४२.७४ | १४९४७९३.०० | ८१७९५२.००<br>५५१३०१.०० | ८१७९५२.०० | - | मंजूर |
| ५. | ७५-७९ निशानपाडा रोड | तिसरा मंडळ | तळ ±४<br>२८ + ८ = ३६ | १३६३.००<br>९८८.७२ | १३४७६३६.०० | ३३९३८६.००<br>२१८११०.०० | ३३९३८६.०० | -- | मंजूर |
| ६. | १२१-१२३-१२५ अबदुल रहेमान स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ ± ४<br>३ +६७ = ७० | २७४९.९३<br>७१९.६९ | १९७८७८७.०० | ११५४१२५.००<br>६७४२१.०० | ११५४१२५.०० | -- | मंजूर |
| **सी १-२ विभाग** | | | | | | | | | |
| ७. | ५ अर्देशिर दादी स्ट्रीट क्रॉस लेन | दुसरा मंडळ | तळ ± ४<br>११ + २ = १३ | १२१६.९०<br>८८८.३७ | १०९१०५७.०० | ५८६५८०.००<br>४०५३३२.०० | ५८६५८०.०० | -- | मंजूर |
| ८. | १४८-१५२ संत सेना महाराज मार्ग | चौथा मंडळ | तळ ± ३<br>३७ + ३ = ४० | ६९९.६४<br>१०११.३२ | ७०७५५७.०० | १८२८२७.००<br>१२३४१५.०० | १७४९१०.०० | ७९१७.०० | मंजूर |

३८९५६१३

४९

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | १९२-१९८ सैफी जुबली स्ट्रीट | सहावा मंडळ | तळ ± ४± ५ भाग / ३७ + ७ = ४४ | १६०४.०० / १०००.९२ | १६०५४८२.०० | ५३०२७९.०० / ३५२९३१.०० | ५२८७९७.०० | १४८२.०० | मंजूर |
| **सी ३-४ विभाग** | | | | | | | | | |
| १०. | ९-११ सी पोफळ वाडी | पहिला मंडळ | तळ ± ४ / १५ + ४ = १९ | ४६५.६० / ८९७.५० | ४१७८८०.०० | ४१७८८०.०० / २६८७००.०० | ४१७८८०.०० | -- | मंजूर |
| ११. | १८४-१९६ पिन्सेस स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ ± ४ / ४ + २२ = २६ | १७९३.१५ / ७२२.८२ | १२९६१३६.०० | ७२९०२५.०० / ४७२०६५.०० | ७२९०२५.०० | -- | मंजूर |
| **डी-१ विभाग** | | | | | | | | | |
| १२. | १९४ जी. जे. एस. एस. मार्ग | चौथा मंडळ | तळ ±३ / २७ +० = २७ | १२०१.६० / ९५७.५५ | ११५०५९५.०० | ७५४५९५.०० / ४८४५१३.०० | ७५४५९५.०० | -- | मंजूर |
| १३. | २० काशिबाई नवरंगे मार्ग/ अलेक्झांड्रा मार्ग | दुसरा मंडळ | तळ ± २ / ३ + ० = ३ | ८८९.७१ / ९०७.२० | ८०७१४६.०० | ६२१०८६.०० / ४३३१०७.०० | ६२१०८६.०० | -- | मंजूर |
| १४. | ७ के.एम. मुंशी मार्ग | पहिला मंडळ | तळ ± १ / १६ + ० = १६ | ३४१.७१ / ७२५.२९ | २४७८३९.०० | २४७८३९.०० / १६२५८०.०० | २४७८३९.०० | -- | मंजूर |
| १५. | २१८-२२० राजा राम मोहन रॉय मार्ग | तिसरा मंडळ | तळ ± २ / ४ + २ = ६ | ६५५.५१ / ९८२.०६ | ६४३७५५.०० | ३६३७५५.०० / २३९१३३.०० | ३६३७५५.०० | -- | मंजूर |
| १६. | २३ डुगरशी मार्ग | चौथा मंडळ | तळ ± २± भाग ३ / ५ + ० = ५ | ६०७.७७ / ९२२.२९ | ५६०५४६.०० | २९६५४६.०० / २१९२७६.०० | २९६५४६.०० | -- | मंजूर |
| १७. | १३५ डी ऑगष्ट क्रांती मार्ग | पहिला मंडळ | तळ ± १ / ९ + २ = ११ | १६१.०३ / १०३५.०६ | १६६६७६.०० | १६६६७६.०० / ११४७१७.०० | १६१०३१.०० | ५६४५.०० | मंजूर |
| १८. | २७-२९-२९- ए, जे. एस. एस. रोड | तिसरा/सु. मंडळ | तळ ± ४ / ८ + ४ = १२ | ९६७.१५ / ९९४.०० | ९६१३५४.०० | ६१३८०४.०० / ५०९८८३.०० | ६१३८०४.०० | -- | मंजूर |
| १९. | २९-बी, खोताची वाडी | दुसरा मंडळ | तळ ± १ / २ + ० = २ | ३५६.०० / ७९१.३४ | २८१७२०.०० | २६६७२०.०० / १८६१८७.०० | २६६७२०.०० | -- | मंजूर |
| २०. | ३० ए, खोताची वाडी | दुसरा मंडळ | तळ ± १ / ५ + १ = ६ | १६७.७० / १५३१.९० | २५६९००.०० | २४४९००.०० / १८१००९.०० | १५५७०१.०० | ८९१९९.०० | मंजूर |
| २१. | १ ए, मोरवी लेन / प्रायव्हेट रोड | पहिला मंडळ | तळ ± ५ / ४७ + ० = ४७ | १६७१.५० / ६०५.२८ | १०११७२९.०० | १०११७२९.०० / ६४९४१०.०० | १०११७२९.०० | -- | मंजूर |

468

10160447

**डी -२ विभाग**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२. | २३५ एन. जावजी दादाजी मार्ग (ताल्मीकी वाडी) | पहिला / मंडळ | तळ ± १ / १९ + २ =२१ | ११४७.३१ / ९५५.०८ | १०९५७८०.०० | १०९५७८०.०० / ८९५२५८.०० | १०९५७८०.०० | -- | मंजूर |
| २३. | २७५ एल, जावजी दादाजी मार्ग (मास्टर बिल्डींग) | दुसरा / मंडळ | तळ ± ३ / ८ + ० = ८ | ७६४.०० / ९७७.०६ | ७४६४७९.०० | ५००३७१.०० / ३३०२७७.०० | ५००३७१.०० | -- | मंजूर |
| २४. | २७५ जी, जावजी दादाजी मार्ग (जुनी कामा बिल्डींग) | दुसरा / मंडळ | तळ ± ३ / १४ + ० = १४ | ९०५.८४ / ९९९.५७ | ९०५४५९.०० | ६४६२७२.०० / ४३०७७६.०० | ६४६२७२.०० | -- | मंजूर |
| २५. | २७-३१ तुळसीवाडी (जर्मन चाळ) | चौथा/सु. / मंडळ | तळ ± ३ / १४६ +१० =१५६ | ३९३८.९५ / १००३.०५ | ३९५०९८५.०० | २०६७२०४.०० / १७०२५६५.०० | २०५५१७१.०० | १२०३५.०० | मंजूर |
| २६. | ३११ ए (आर. ब्लॉक) दलाल इस्टेट | पहिला / मंडळ | तळ ± ६ / १२ + २ =१४ | ११३२.९५ / ६१९.४७ | ७०१८३१.०० | ७०१८३१.०० / ५०३९१०.०० | ७०१८३१.०० | -- | मंजूर |
| २७. | ३९४ एम. एस. अली रोड (उमर मेन्शन) | पांचवा / मंडळ | तळ ± ४ / १९ + १५ =३४ | २६१०.२५ / ९८६.०० | २५७४१४१.०० | ६१६४८०.०० / ४०१८८१.०० | ६१६४८०.०० | -- | मंजूर |
| २८. | १४३-१४७ ताडदेव रोड | तिसरा / मंडळ | तळ ± ४ / ४२ + १३ = ५५ | ३९१२.०० / ६८३.०३ | २६७२०१९.०० | १०२२०१९.०० / ७१६५७४.०० | १०२२०१९.०० | -- | मंजूर |

३२४

1,68,10,404

## परिशिष्ट 'ब'

मंडळाच्या दिनांक ३/४/२००२ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी.

ई विभाग

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ई | अ | १२-२०, मौलाना आझाद रोड (डंकन रोड), मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>१० + ६= १६ | ६४७.८७<br>९३९.४८ | ६०८६६६/-<br>२९४६५७/- | २९४६५७/- | -- | मंजूर |
| २. | -"- | -"- | १५२-१६४, भिमा सदन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>३ + ८ = ११ | ४९७.३३<br>९००.६५ | ४४७९२४/-<br>४४७९२४/- | ४४७९२४/- | -- | -"- |
| ३. | -"- | -"- | ३४-३६, बाबूला टँक रोड, नागपाडा,मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ + ४<br>२७ +२ = २९ | ९८२.६०<br>९२४.०० | ९०७८५१/-<br>४६८९३७/- | ४६८९३७/- | -- | -"- |
| ४. | -"- | -"- | १४२-१४४, मौलाना शौकतअली रोड, नागपाडा, मुंबई | ति. टप्पा सुधा.<br>मंडळ | तळ + ३<br>५६ +२२ = ७८ | २५५२.००<br>९८५.०० | २५१२८५४/-<br>१३७०५८९/- | १३७०५८९/- | -- | -"- |
| ५. | -"- | -"- | ३०९-३२५, साने गुरुजी मार्ग (अे विंग), मुंबई | तिसरा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ + २<br>८ + ९ = १७ | ६९४.५०<br>८९९.६१ | ६२४७८२/-<br>२७४००२/- | २७४००२/- | -- | -"- |
| ६. | -"- | -"- | २-६, मौलाना आझाद रोड, इ.क्र.३०७ बी, साने गुरुजी मार्ग, ( बी विंग), मुंबई | तिसरा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ + २<br>१९ + ८ = २७ | १००४.४५<br>११२४.४६ | ११२९४६३/-<br>६२२१३४/- | ६२२१३४/- | -- | -"- |
| ७. | -"- | -"- | २-६, मौलाना आझाद रोड, इ.क्र.३०५-३०७, साने गुरुजी मार्ग, ( सी व डी विंग), मुंबई | तिसरा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ + २<br>२३ + ८ = ३१ | ९५७.६६<br>८०५.५१ | ७७१४०२/-<br>२८७७०५/- | २८७७०५/- | -- | -"- |
| | | | | | | | ७००२९४२/-<br>३७६५९४८/- | ३७६५९४८/- | | |



५५

**फ.ग.(द) विभाग**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ.ग/द | अ | १३३-अे, मेघवाडी, अे ब्लॉक, डॉ.एस.एस.राव रोड, लालबाग, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>७८ + ० = ७८ | १६७०.८१<br>९७१.५४ | १६२३२७२/-<br>४५५८९७/- | ४५५८९७/- | -- | मंजूर |
| २. | -"- | -"- | ५५८-५६२, मस्जीद चाळ, डॉ.ई.मोझेस रोड, सातरस्ता, वरळी,मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>१२+१० = २२ | ५४०.००<br>९१०.६२ | ४९१७४०/-<br>१३१४९९/- | १३१४९९/- | -- | -"- |
| ३. | -"- | -"- | १-१अे, ईराणी चाळ, न्यू प्रभादेवी रोड, मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>१४+ ६ =२० | ३९७.१०<br>१०९४.०५ | ४३४४४९/-<br>२००३७९/- | १६३०३०/- | ३७३४९/- | -"- |
| ४. | -"- | -"- | २५१० अे,बी,डी,हिंद ज्योती बिल्डींग, झकेरिया बंदर मार्ग,काळाचौकी, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + २<br>९ + ५ = १४ | ९३४.५०<br>९६९.३३ | ९०५८३९/-<br>९०५८३९/- | ९०५८३९/- | -- | -"- |
| ५. | -"- | -"- | ५२, परेल व्हीलेज, मुंबई | पहिला टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>३ + ० = ३ | १३४.२४<br>९६०.६७ | १२६०७९/-<br>१२६०७९/- | १२६०७९/- | -- | -"- |
| ६. | -"- | -"- | ९२-बी, रहिमाबाई बिल्डींग, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पुर्व), मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ + १<br>१४ +६ =२० | ८९१.७४<br>९५१.९२ | ८४८८७२/-<br>६३९८७३/- | ६३९८७३/- | -- | -"- |
| ७. | -"- | -"- | ७२-अे, हुसैनी बिल्डींग, आचार्य दोंदे मार्ग,परळ | ति.टप्पा सुधा.<br>मंडळ | तळ + ३<br>३५ + ११ =४६ | १३७४.९३<br>१०००.५० | १३७५६२५/-<br>९२५९७१/- | ९२५२७६/- | ६९५/- | -"- |
| ८. | फ.ग/द | अ | १५४,जैन हाऊस, जेरबाई वाडिया रोड,परळ,मुंबई | प.टप्पा सुधा.<br>मंडळ | तळ + ३<br>१३ +६ =१९ | १०५६.४०<br>९६६.१८ | १०२०६८०/-<br>१०२०६८०/- | १०२०६८०/- | -- | -"- |
| ९. | फ.ग/द | अ | निर्मला निवास, 'बी" ब्लॉक, आई माई मेरवानजी स्ट्रीट, मुंबई | दुसरा टप्पा<br>ना.ह.प्र. | तळ + २<br>६७ +१६ = ८३ | २६७८.३४<br>९९३.३४ | २३६३७६२/-<br>१८९७१४४/- | १८९७१४४/- | -- | -"- |
| | | | | | | | १०२१०९९८/-<br>७३२४०४१/- | ७२८५९९७/- | ३८०४४/- | |

1292

**फ.ग.(उ) विभाग**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ.ग/उ | क | १०५, कुमकुम बिल्डींग, शिवडी वडाळा क्रॉस रोड, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ३ १६+ ० = १६ | ९१९.०० ८०९.८२ | ७४४२२७/- ५८८८०३/- | ५८८८०३/- | -- | मंजूर |
| २. | -"- | अ | १५, जया भवन, पिंताबर लेन, माहिम, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ २ २९+२ = ३१ | ९०७.११ ९६९.७४ | ८७९६६१/- ११९३२९/- | ११९३२९/- | -- | -"- |
| ३. | -"- | -"- | १५०,काद्री मेन्शन, एल.जे.रोड, माहिम,मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ४ १९+ ५=२४ | ११८३.१७ ५७०.०२ | ६७४४३७/- ६०२८४१/- | ६०२८४१/- | -- | -"- |
| ४. | -"- | क | ३०१,शांता भवन, जैन देरासर मार्ग, वडाळा, मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ ३ ११+१=११ | ९७८.८४ ७२४.४१ | ७०९०७९/- ७०९०७९/- | ७०९०७९/- | -- | -"- |
| ५. | -"- | अ | २४-पी, अझीझ मंझील, दर्गा स्ट्रीट, माहिम,मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ २ ३ + ०= ३ | ३८८.५० ९५६.७९ | ३७१७१६/- ३७१७१६/- | ३७१७१६/- | -- | -"- |
| ६. | -"- | क | ४७, अलंकार बिल्डींग, रोड क्र.१४, स्कीम नं.५७, वडाळा, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ३ ८+ ०= ८ | ९०८.७० ९२२.५४ | ८३८३२१/- ५७४८३९/- | ५७४८३९/- | -- | -"- |
| ७. | -"- | अ | १५, मावजी मेन्शन, बालमिया लेन, माहिम, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २ २८+ ०= २८ | ४५४.७३ ११७३.९० | ५३३८०८/- २३३८५५/- | १५४७७७/- | ७९०७८/- | -"- |
| ८. | -"- | क | २९, हेटकर महाजन वाडी, पोर्तुगीज चर्च रोड,दादर, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ ३ १८+० = १८ | ७७७.३१ ८९०.८९ | ६९२५०३/- ३७०००८/- | ३७०००८/- | -- | -"- |
| ९. | फ.ग/उ | अ | ६०-६२, फॅन्सी टेरेस, (इसाकअली बिल्डींग), एल.जे.रोड,माहिम, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ १ २२+ १२= ३४ | १४५९.५९ ६९३.५३ | १०१२२७२/- ५९८१५०/- | ५९८१५०/- | -- | -"- |
| १०. | -"- | ब | प्लॉट नं.१६, रिबेका लॉज, सायन माटुँगा इस्टेट, सायन (पश्चिम), मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ४ १५+ ०= १५ | ७७२.०० ९१९.७९ | ७१००८४/- ४८४१८४/- | ४८४१८४/- | -- | -"- |
| ११. | -"- | अ | १०-सी, वसंत भुवन, के.व्ही.चितळे पथ,दादर | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २ १२+ ०= १२ | ५४५.२५ ९५८.५६ | ५२२६५५/- ४५७२२५/- | ४५७२२५/- | -- | -"- |

१४९१

५९

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | -"- | -"- | ३७४, विश्रानी भवन, तेलंग क्रॉस रोड, माटुंगा, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ २<br>२४+ २ = २६ | ८९२.९४<br>९६०.८३ | ८५७९६६/-<br>४४०३३७/- | ४४०३३७/- | -- | मंजूर |
| १३. | -"- | -"- | ५-५अे, वरखाना भवन, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २<br>५+ ५= १० | ५५७.७२<br>९१९.०४ | ५१२५६८/-<br>४१७३६७/- | ४१७३६७/- | -- | -"- |
| १४. | -"- | क | २४, जॉर्ज कोर्ट, शितलादेवी टेपल रोड, माहिम,मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ ३<br>८ + ० = ८ | ६१८.१३<br>९८९.६० | ६११७०३/-<br>१८८२९८/- | १८८२९८/- | -- | -"- |
| १५. | -"- | अ | ४३, कॉन्ट्रक्टर हाऊस, मोरी रोड, माहिम, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ३<br>७+ ०= ७ | ५५७.८९<br>९०८.५७ | ५०६८८५/-<br>४६१२९१/- | ४६१२९१/- | -- | -"- |
| १६. | -"- | क | १५-जी, अहमद बिल्डींग, गोखले रोड, दादर,मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ २<br>६ + १= ६ | ३८३.८८<br>७८७.१८ | ३०२१८४/-<br>३०२१८४/- | ३०२१८४/- | -- | -"- |
| १७. | -"- | अ व क | २६६-अे, उमा निवास,देवधर रोड, माटुंगा मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ ३<br>११ + १= १२ | ७५५.२०<br>६१३.१७ | ४६३०६६/-<br>४६३०६६/- | ४६३०६६/- | -- | -"- |
| १८. | -"- | क | ३४-अे, चंपा आश्रम, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ ४<br>११ + ०= ११ | ५९७.३८<br>९२४.९४ | ५५२५४१/-<br>५५२५४१/- | ५५२५४१/- | -- | -"- |
| १९. | -"- | अ | २८, प्रजापती भवन, गोखले रोड (नॉर्थ), दादर | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २<br>१२+ ७ = १९ | ९३६.२२<br>९५४.५९ | ८९३५२०/-<br>६१२६५४/- | ६१२६५४/- | -- | -"- |
| २०. | -"- | अ व क | १४, जमनादास मेन्शन, लक्ष्मी नारायण लेन, माटुंगा, मुंबई | चौथा टप्पा मंडळ | तळ+ ५<br>५३+ ९= ६२ | २७७६.३७<br>६२३.१२ | १७३००३१/-<br>१२३७८५१/- | १२३७८५१/- | -- | -"- |
| २१. | -"- | अ | २९-३७, पाध्ये वाडी, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई | दु.टप्पा सुधा मंडळ | तळ+ १<br>१३+१० = २३ | ७७०.३६<br>१०११.९८ | ७७९५८९/-<br>७७९५८९/- | ७७०३६०/- | ९२२९/- | -"- |
| २२. | -"- | क | २५५, विनोद कुंज, वडाळा स्टेशन रोड,वडाळा,मुंबई | दु.टप्पा सुधा मंडळ | तळ+ ४<br>१३+० = १३ | १०२४.९०<br>१०००.४२ | १०२५३३१/-<br>१०२५३३१/- | १०२४९००/- | ४३१/- | -"- |

1689

६७

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३. | -"- | अ | १२६-१२६ एफ, जीवनप्रकाश, सेनापती बापट मार्ग, मुंबई | प.टप्पा सुधा मंडळ | [illegible]+ ३<br>३२+१७ = ४९ | २०७३.०६<br>८७८.६४ | १८२१४७४/-<br>१८२१४७४/- | [illegible]८२१४७४/- | -- | मंजूर |
| २४. | -"- | ब | ५-५बी, ९-९डी, इंडियन मर्कटाईल बिल्डींग, रानडे रोड, दादर,मुंबई | दु.टप्पा सुधा मंडळ | तळ+ ५<br>२५+२१ = ४६ | २१४५.७५<br>९१८.९८ | १९९९०४४/-<br>१७३७८३६/- | १७३७८३६/- | -- | -"- |
| २५. | -"- | अ | २१३-१५-१७-२१९,पारेख महल, एल.जे.रोड,माहिम, मुंबई | ति.टप्पा सुधा मंडळ | तळ+ ४<br>१३९+४५ =१८४ | ६२७६.००<br>१०००.५४ | ६२७९३६७/-<br>४०८०२५३/- | ४०७६८८६/- | ३३६७/- | -"- |
| २६. | -"- | क | ३५७, श्यामजी लद्ढा बिल्डींग, भांडारकर मार्ग, माटुंगा, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २<br>१२+१० = २२ | ११७०.६०<br>६३६.३१ | ७४९३२२/-<br>६११३८४/- | ६११३८४/- | -- | -"- |
| २७. | -"- | अ | २२-२२अे, कवडे बिल्डींग, धारावी गल्ली, धारावी रोड, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ १<br>७+ १ = ८ | ९०७.४९<br>८२७.५९ | ६६९५३९/-<br>६४८१२०/- | ६४८१२०/- | -- | -"- |
| | | | | | | | २७४४२८९३/-<br>२०५६९६०५/- | २०४७७५००/- | ९२१०५/- | |

१५१४